जसं घडलं तसं..

३,४ आणि ५ जुलै रोजी फ़िलाडेल्फिया इथे झालेलं बृहनमहाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन भारतात खूप गाजलं. तिथल्या वर्तमानपत्रातून बातम्याच तशा येत होत्या..एकापेक्षा एक कौतुकास्पद. पण खरी सणसणीत बातमी म्हणजे - “"जुळवू नाते मनाशी मनाचे"”, हे ब्रिदवाक्य असलेल्या बृहनमहाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात मनं दुखावली गेली ती रसिकांची, कलाकारांची आणि अर्थातच आयोजकांची.

आपल्या गावातलं अधिवेशन हे "न भूतो न भविष्यति” असं झालं पाहिजे हे त्या गावातल्या प्रत्येकाला वाटत असतं, तसे प्रयत्नही होतात पण...ह्या ‘पण’च सगळं होत्याचं नव्हतं करतो. हेच पहा नं..जो तो म्हणत होता अधिवेशन तसं ठीक होतं पण नुसता सावळा(नव्हे काळाकुट्टं ) गोंधळ होता, तिथले कार्यकर्ते तयार होऊन छान आले होते पण अनेकांचं वागणं मात्रं छान नव्हतं.. काही फारच उर्मटासारखे वागत होते राव, जेवणाचं दालन सुंदरच होतं, मोठठं होतं पण तिथली व्यवस्था, मांडणी यावर कुणी विचारच केला नव्हता, जेवण मस्त होतं, मेनू झक्कास होता पण ब-याचदा हे नुसतं ऐकलं कारण मिळालंच नाही, कार्य़क्रम चांगले होते पण आयत्या वेळेस वेळांचा घोळ केल्याने आणि तो वेळेवर न कळवल्याने बहुतांशी कार्यक्रम पहाणं झालंच नाही, सुयोग नाट्य़संस्था चांगलीच नावाजलेली आहे हे कबूल पण काय ती

यावेळची नाटकं,अरेरे!, उत्तर अमेरिकेतल्या कलाकारांचे कार्यक्रम सर्वोत्क्रृष्ट होते पण ते छोट्या सभागृहात ठेवल्याने अनेकांना पहाताच नाही आले..उदा स्वरगंध, उभ्या उभ्या विनोद, स्वरपालवी असे अनेक. एकांकिका झाल्या नं पण जी स्पर्धा होणार होती ती मात्रं नाही झाली आणि त्याचं कारण सांगितलं बुवा आयोजकांनी पण पटलं कुणालाच नाही. गंमत अशी की डिस्नेलॅंड्ला कशा वेगवेगळ्या राईड्स असतात आणि प्रत्येक राईडला कशी गर्दी असते तशी गर्दी ८००० हून अधिक लोकं आली असती, तर प्रत्येक कार्यक्रमाला झाली असती असा विचार करून आयोजकांनी अगणित कार्यक्रम मंजूर केले पण आयत्या वेळेस लोकं कमी आल्याने म्हणे बिचा-यांचं सगळं प्लॅनिंग चुकलं म्हणून मग जिथे तिथे, ज्यात त्यात बजेटकट - वैताग साला.........ही नि अशी कितीतरी विधानं. 'पण' च्या मागेपुढे येऊन अधिवेशन खरं कसं झालं याची माहिती देणारी. अर्थात ही बातमी भारतापर्य़ंत जाहिरपणे पोचली नाही हे उत्तमच कारण शेवटी बृहनमहाराष्ट्रमंडळाबद्द्ल आपल्या मनांत आपलेपणा असतो, आपल्या अधिवेशनाबद्द्ल मनांत अभिमान देखिल असतो, आणि ज्या कार्यकर्त्यांनी दिवसरात्रं एक करून अपार मेहनत केलेली असते त्यांची कदरही असते नि म्हणूनच भारतातल्या कुणा पत्रकाराने येऊन आपल्याबद्द्ल काहीबाही छापलेलं आपल्याला पटत नाही हे खरं पण "जे झालं ते उत्तमच झालं" अशी खोटी स्तुती करणंही इथल्या रसिकांना पटत नाही हे ही तितकंच खरं. शेवटी आपलेच दात आणि आपलेच ओठ. चुका दाखवायच्या आपण आणि त्या चुका पुन्हा होऊ नये म्हणून

सर्वतोपरी मदत करायची ती ही आपणच. या आपलेपणा पोटीच फ़िलाडेल्फियाच्या अधिवेशनाला आलेले अनेकजण शिकागोचा जो कुणी भेटेल त्याला कळकळीने सांगत होते - तुम्ही प्लीज असं अधिवेशन करू नका.

पण मुळात हे अधिवेशन असं झालंच कसं? सियाटलला जेव्हा फिलाडेल्फियाच्या कार्यकर्त्यांनी "आमच्या फिलाडेल्फियाला या" असं खास आमंत्रण देणारी जी फ़िल्म दाखवली ती पाहून फिलाडेल्फियाचं अधिवेशन खास होणार असा विश्वास प्रत्येकाला होता, अपेक्षाही उंचावल्या होत्या पण (पुन्हा पण) नको इतक्या अपेक्षा ठेवल्या इथेच चुकलं का? मुळात या अपेक्षा आयोजकांनीच वाढवल्या त्यामुळे नेमकं कुणाचं कुठे नं काय चुकलं हे कळणं तसं कठीणच. इ-प्रसारणवर मुलाखत देताना वेगवेगळ्या कमिटीचे कार्य़कर्ते वेगळ्याच उत्साहात भरभरून बोलत होते, वेबसाईटवरून, इमेलमधून वेळोवेळी अचूक माहिती देण्यात येत होती, कितीतरी सुविधा नव्याने सुरू करण्यात आल्या, बेबी सिटींगची सोय तर भन्नाटच, लहान मुलांचा विचार करून कार्यक्रम आखण्यात येत होते, online payment करताना काही त्रास झाल्यास, काही शंका असल्यास त्या शंकेचं निरसन करणारी इमेल दोन दिवसात यायचीच यायची, north america programming committee वर असलेले कार्यकर्ते तुम्हाला काय मदत लागणार आहे ते जरूर कळवा असं आत्मियतेने विचारायचे, इमेलमधून विचारांची देवाणघेवाण व्हायची..पण नंतर माशी कुठे शिंकली कुणास ठाऊक? कुणा आल्यागेल्याची, भूताखेताची... दृष्ट लागली आणि चित्रच

पालटलं. शेवटच्या दोन महिन्यातला आपला अनुभव सांगताना इथले अनेक कलाकार म्हणाले की त्या काळात इमेलला उत्तर नाही, फ़ोनला प्रत्युत्तर नाही, कुणी चुकून फ़ोन उचललाच तर "मिटींगमध्ये बोलून कळवतो"हे ठरलेलं उत्तर. आणि मग मिटींग झाल्यावर विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर मिळायच का? तर "नाही" हेच त्यावरलं उत्तर . हे तर मी ही अनुभवलं. भारतातले कलाकार सांगत होते की ते तर व्हिसाच्या गोंधळामुळे मेटाकुटीला आले होते. भरमसाठ व्यावसायिक कलाकार भारतातून येणार होते..आणि त्यांची येण्याजाण्याची, रहाण्याची, खाण्यापिण्याची, मानसन्मानाची अशी सगळी व्यवस्था नीट व्हावी म्हणून इथल्या स्थानिक कलाकारांनी फ़ुकट किंवा कमी बजेटमध्ये कार्यक्रम करावेत या आयोजकांच्या अपेक्षेमुळे स्थानिक कलाकार देखिल मेटाकुटीला आले होते. धड स्टेज नाही, audio ची सोय यथातथाच, मनाजोगते लाईट्स नाहीत.. म्हणून व्यावसायिक आणि स्थानिक असे सगळेच कलाकार वैतागलेले होते. स्थानिक कलाकारांचं तर दुःखं आणखीनच वेगळं. आपलीच माणसं, आपलंच मंडळ असं म्हणत इथल्या काही कलाकारांनी कार्यक्रम करण्याआधी स्वतःच स्टेज लावलं, सजवलं, ध्वनिसंयोजनाची जबाबदारी देखिल उचलली आणि स्वतःची कितीही गैरसोय होत असताना केवळ आयोजकांच्या आदेशावरून ते म्हणतील तिथे नि तेव्हा कार्यक्रम सुरू केला आणि ऐन रंगात आलेला कार्यक्रम बंदही केला. "एवढ्या मोठ्या अधिवेशनात आम्ही तुम्हाला स्टेज देतो" - या आयोजकांच्या उदात्त भावनेचं ओझं मनावर बाळगणा-या स्थानिक कलाकारांची "पैसे नाही दिले तरी चालतील पण प्रेक्षक द्या" एवढी माफक अपेक्षा होती पण ती ही पूर्ण

झाली नाही. एकाच वेळेस अनेक चांगले कार्यक्रम लावल्याने धड एक कार्यक्रम नीट पाहिल्याचं समाधान ना रसिकांना मिळालं, ना भरपूर प्रेक्षकांसमोर कार्यक्रम केल्याचं समाधान कलाकारांना मिळालं. जे या अधिवेशनाला पहिल्यांदाच आले होते त्यातल्या अनेकांनी विचारलं की हे अधिवेशन नक्की कशाला असतं? कुणासाठी असतं?? नेमकं उत्तर माझ्याकडे तेव्हाही नव्हतं आणि अजूनही नाही...उत्तर शोधण्याचा प्रयत्न मात्रं चालू आहे.

शिकागोला जेव्हा ४०० लोकांच्या उपस्थितीत पहिलं अधिवेशन झालं त्या अधिवेशनात मोठा थाटमाट नव्हता पण जिव्हाळा होता. उत्तर अमेरिकेतल्या मराठी लोकांनी एकत्रं येऊन काहीतरी आनंददायी करावं एवढी एकच भावना त्यामागे होती. हळूहळू या भावनेच्या जोडीला स्पर्धा आली. "तुमच्यापेक्षा आम्ही सरस करून दाखवतो" ही जिद्द स्पर्धेत असावी पण "तुम्हाला काय येतंय? आम्ही पहा कुणाकुणाला बोलावतो आणि कसं थाटात करतो" हा वृथा अभिमान कशाला? मुळात भारतातून नामांकित कलाकार येताहेत म्हणून अधिवेशनाला किती जण येतात आणि आपल्या इथल्या मित्रांचा कार्यक्रम आहे त्यांचं कौतुक करायला, जुन्या मित्रमंडळींना भेटायला किती जण येतात याचं गणित कधी कुणी मांडलंय का? भारतातून कलाकार जरूर आणावेत पण ते किती आणि त्यांच्यावर किती खर्च करावा याचा विचार करणं गरजेचं नाही आहे का? स्थानिक कलाकार हे व्यावसायिक कलाकारांपेक्षा वाईटच ह्या भ्रमात किती दिवस रहायचं आणि का म्हणून? स्थानिक कलाकार जीव ओतून आपली कला सादर करतात, यावेळेसही केली पण त्याचं

कौतुक एका तरी पत्रकाराने भारतातल्या वर्तमानपत्रांतून केलं का? भारतातून दीड-दोन लाख डॉलर्स खर्च करून एखादा कलाकार आणला नाही तर अधिवेशनाची उपस्थिती कमी होईल का आणि इथल्या कलाकारांचे कार्यक्रम जास्त ठेवले तर उपस्थिती वाढेल का - याचा ताळा कुणीतरी मांडून पाहिला का? खरंच, हे अधिवेशन नक्की कशाला असतं? कुणासाठी असतं?? याचं उत्तर शोधताना मनात अशा असंख्य प्रश्नांची गर्दी होते. इथे ३०-४० वर्ष रहाणा-या बुजुर्गांनी या सगळ्या प्रश्नांवर नक्की विचार केला असेल पण तो विचार इथल्या नव्या जोमाच्या, आधुनिक विचारांच्या तरूण पिढीने विचारात न घेतल्याने यावेळचं अधिवेशन असं झालं का? या अधिवेशनात तर सहज टाळता आल्या असत्या अशा कितीतरी ठळक चुका दिसताहेत हे मी तिथल्या कार्यकारिणीतल्या ज्यांना ज्यांना बोलून दाखवलं त्यातल्या अनेकांनी “हे असं होणार हे आम्हाला आधीच माहिती होतं” असं मला बोलून दाखवलं. अरे मग माहिती होतं तर काही केलं का नाहीत? चुकीचं होतंय हे कळत असून कुणी काही बोललं का नाही? असे अनेक प्रश्न विचारावेसे वाटत होते पण “आम्ही सांगून थकलो आणि भांडूनही थकलो” अशी असहाय्यता त्यांच्या चेह-यावर दिसल्याने सारे प्रश्न मनांतच राहिले.

झालं गेलं होऊन गेलं. मनःस्ताप विसरला गेला..भांडणं देखिल विसरली गेली..मग असं असताना हे एवढं लिहिलं कशासाठी? "मी स्वतःला काय समजते" असंही अनेकांना वाटणं स्वाभाविक आहे पण मनापासून सांगते की मी स्वतःला अनेकांतली एक समजते.

जे इतरांनी आपली समजून मला बोलून दाखवलं ते मी जसंच्या तसं एवढ्याकरताच लिहिलं कारण  हे असंच पुन्हा पुन्हा होऊ नये म्हणून.  कुठ्ल्याही कलाकाराला आपली मेहनत फ़ुकट गेली असं वाटू नये म्हणून आणि कुठल्याही रसिकाच्या मनात आपण इतका खर्च करून अधिवेशनाला कशाला आलो असंही वाटू नये म्हणून.

अधिवेशनात अनेक गोष्टी कौतुकास्पद होत्या, कार्यक्रम वाखाणण्याजोगे होते आणि त्याबद्दल, त्यासंदर्भात अनेक लेख बृहनमहाराष्ट्र वृत्तात वाचायला मिळतील, एकतात वाचायला मिळतील पण (लेख संपत आला तरी "पण" सुटत नाही) हे असं लिहिणं मात्रं सगळेच टाळतात.. .. बोलतात मात्रं जरूर आणि खरं तर ही टिका नाही, कुणाला दुखावण्याचा हेतू तर त्याहून नाही आणि कुणाबद्दल राग ठेवून तर हे मुळीच लिहिलेलं नाही. केवळ जे घडलं, जे जाणवलं, जे ऐकलं नि जे अनुभवलं ते प्रामाणिकपणे मांडलं. हे ही प्रामाणिकपणे कबूल करते की अधिवेशन आवडलेले, अधिवेशनातल्या कार्यक्रमांना मनापासून दाद देणारे, जेवणाच्या मेनूवर  खूष असलेले रसिकही मी पाहिले. अनेकांनी जीव ओतून काम केलं, रात्रीचा दिवस केला याची जाणिव निश्चितच आहे..इतक्या त्रासात देखिल शांत डोक्याने कामं करणारे आणि समोरचा चिडून बोलतोय तरी न चिडता त्याच्या शंकेचं निरसन करणारे अनेक कार्यकर्तेही मी पाहिले आणि त्या सगळ्यांना मानाचा मुजरा, शतशः धन्यवाद पण.....

हा पणच पुढल्या अधिवेशनात खटकू नये म्हणून हे मनोगत!